**संचालनालयाचे बळकटीकरण अंतर्गत विभाग व जिल्हा स्तरावरील रिक्त पदांवर महाराष्ट्र नगरपरिषद राज्यस्तरीय संवर्ग (गट-क) मधील कर्मचाऱ्यांचे प्रतिनियुक्तीने पदस्थापना करणेबाबत**

# नगरपरिषद प्रशासन संचालनालय

७ वा मजला, बेलापूर भवन, सी.बी.डी, बेलापूर, नवी मुंबई - ४०० ६१४

क्र.नपप्रसं-२०२५/कक्ष-३/संवर्ग-कर्म/बदली/5025

दिनांक - 01 JUL 2025

वाचा -:

१. संचालनालय बळकटीकरण शासन निर्णय क्र.एमसीओ-२०१८/प्र.क्र.१३९/नवि-१४, दि.०५-०८-२०२०
२. महाराष्ट्र नगरपरिषद / नगरपंचायत औद्योगिक नगरे राज्यसेवा (समावेशन, सेवाप्रवेश व सेवाशर्ती) नियम, २००६
३. नगर विकास विभाग, शासन निर्णय क्र एमसीओ-२०१७/प्र क्र ११९/नवि-१४, दि ११-०५-२०१७
४. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र एसआरव्ही-२०११/प्र क्र १३७/कार्या-१२, दि १७-१२-२०१६
५. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र एसआरव्ही-२०१६/प्र क्र ५१०/कार्या-१२, दि १६-०२-२०१८
६. संचालनालयाचे बदली आदेश दि ३०-०५-२०२५

## : प्रतिनियुक्ती/ सेवावर्ग आदेश :

०१ उपरोक्त वाचा क्र १ च्या शासन निर्णयान्वये नगरपरिषद प्रशासन संचालनालयाचे बळकटीकरण करण्यात आले असून संचालनालयाच्या मुख्यालय, विभागीय स्तर व जिल्हा स्तरावरील आकृतीबंध सुधारीत करण्यात आला असून एकूण ५०३ स्थायी पदांना सुधारीत आकृतीबंधानुसार मान्यता देण्यात आली आहे. त्यामुळे विभागीय स्तर व जिल्हा स्तरावर विविध पदे रिक्त आहेत. त्यामुळे विभागीय व जिल्हा पातळीवर नगरपरिषदा तसेच नगरपंचायतीच्या कामकाजावरील सनियंत्रण व पर्यवेक्षण यामध्ये अडचणी निर्माण होत आहेत.

०२ सबब वाचा क्र ४ व ५ मधील शासन निर्णयातील तरतुदींनुसार महाराष्ट्र नगरपरिषद राज्यस्तरीय संवर्ग कर्मचाऱ्याच्या वाचा क्र ६ मधील आदेशात अंशतः बदल करून खालील तक्त्यात नमूदप्रमाणे रकाना क्र ७ मध्ये दर्शविलेल्या कार्यालयात प्रतिनियुक्तीने पदस्थापना करण्यात येत आहे.

| अ क्र | कर्मचाऱ्याचे नाव | संवर्ग व श्रेणी | बदलीपूर्व कार्यरत कार्यालय/ नगरपरिषद | दि ३०-०५-२०२५ रोजी बदलीने पदस्थापना दिलेली नगरपरिषद | दि ३०-०५-२०२५ रोजीचे बदली आदेश क्रमांक | प्रतिनियुक्तीने पदस्थापना देण्यात आलेले पद व कार्यालय |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | संग्राम भास्कर नार्वेकर | कर निर्धारण व प्रशासकीय सेवा श्रेणी अ | खानापूर जि सांगली | बारामती जि पुणे | आदेश क्र ४२४८ | सहायक, नगर परिषद प्रशासन शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय सांगली पद उन्नत करून |
| २ | कृष्णा बाळासाहेब लाड | कर निर्धारण व प्रशासकीय सेवा श्रेणी ब | पालम जि परभणी | हिंगोली जि हिंगोली | आदेश क्र ४२४८ | अधीक्षक, नगर परिषद प्रशासन शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय परभणी पद अवनत करून |
| ३ | निकिता शंकर पाटील | संगणक अभियंता श्रेणी क | पेण जि रायगड | मालवण जि सिंधुदुर्ग | आदेश क्र ४२७२ | सहायक, नगर परिषद प्रशासन शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय रायगड पद उन्नत करून |
| ४ | अमित मार्कंड नंदागवळी | संगणक अभियंता श्रेणी क | साकोली जि भंडारा | तिरोडा जि गोंदिया | आदेश क्र ४२७२ | PM Gati Shakti अभियान करिता - MRSAC नागपूर कडे सेवा वर्ग |

१. सदरची प्रतिनियुक्ती ही महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयेतर सेवा आणि निलंबन, बडतर्फी व सेवेतून काढून टाकणे यांच्या काळातील प्रदाने) नियम १९८१ मधील तरतुदी आणि खालील अटींच्या अधीन राहून करण्यात येत आहे.
२. सदरची प्रतिनियुक्ती ही ३ वर्ष कालावधीसाठी करण्यात येत आहे.
३. जर त्यांची सेवा लोकसेवेच्या हिताच्या दृष्टीने या संचालनालयास आवश्यक वाटली नाही तर कोणत्याही वेळी त्यांना त्यांच्या मूळ विभागाकडे संवर्गातील पदावर पाठविण्यात येईल
४. संबंधित कर्मचारी यांना सध्याच्या कार्यरत पदावरुन दि ०१-०७-२०२५ रोजी (म नं) पासून कार्यमुक्त करण्यात येत आहे. मुख्याधिकारी यांनी रिक्त राहणाऱ्या पदाचा अतिरिक्त कार्यभार संवर्गातील इतर कर्मचाऱ्यास देण्यात यावा.
५. संबंधित अधिकारी/ कर्मचारी यांनी पदस्थापना दिलेल्या ठिकाणी दि ०२-०७-२०२५ रोजी रुजू होऊन तसा आपला अहवाल तात्काळ संचालनालयास सादर करावा.
६. संबंधित अधिकारी/कर्मचारी हे कार्यमुक्त झाल्यानंतर पदस्थापनेच्या ठिकाणी रुजू न झाल्यास व परस्पर रजेवर गेल्यास ती रजा अनधिकृत समजण्यात येवून संबंधित कर्मचाऱ्या विरुध्द शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल.
७. संबंधित अधिकारी/कर्मचारी यांचे प्रतिनियुक्तीनंतरचे वेतन व भत्ते बदलीने पदस्थापना होणाऱ्या कार्यालयातून काढण्यात यावेत.
८. श्री नंदागवळी यांचे सेवावर्ग कालावधीतील वेतन व भत्ते तिरोडा नप जि गोंदिया यांनी अदा करावेत.
९. संबंधित अधिकारी/कर्मचारी यांची विशेष बाब म्हणून प्रतिनियुक्ती केलेली असल्याने त्यांना बदलीप्रवास भत्ता अनुज्ञेय असणार नाही.
१०. या आदेशान्वये केलेली पदस्थापना रद्द करणे, त्यात बदल करणे यासाठी कोणत्याही प्रकारचे दडपण / दबाव आणू नये. तसे केल्याचे आढळून आल्यास महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम १९७९ च्या नियम २३ नुसार शिस्तभंगाची कारवाई होऊ शकेल याची संबंधित कर्मचाऱ्याने नोंद घ्यावी.

(अभिषेक कृष्णा भा प्र से)
आयुक्त तथा संचालक
नगरपरिषद प्रशासन संचालनालय

प्रत:
१. मा प्रधान सचिव (नवि-२), नगरं विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांना माहितीस्तव
२. उप सचिव/ अवर सचिव/ कक्ष अधिकारी, नवि-१४, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
३. संबंधित सह आयुक्त,नगरपरिषद प्रशासन शाखा, विभागीय आयुक्त कार्यालय/जिल्हाधिकारी कार्यालय
४. संबंधित मुख्याधिकारी, नगरपरिषद/नगरपंचायत
५. संबंधित कर्मचारी